# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्सः ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in
संकेत स्थळ : www.merc.gov.in / www.mercindia.org.in


## जाहीर नोटीस

**महाराष्ट्र राज्यातील वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी करण्यासाठी आयोगाने स्वत:हून सुरु केलेल्या कार्यवाहीसंबंधी जनतेकडून सूचना आणि हरकती मागविण्याबाबत**

१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन विनियम, २०१० मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, राज्यातील वितरण परवानाधारकांनी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी प्रतिवर्षी करीत असतो. त्यानुसार महाऊर्जाने सादर केलेल्या माहितीच्या आधारे आयोगाने खालील प्रकरणांमध्ये राज्यातील वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी करण्यासाठी कार्यवाही सुरु केली आहे व वितरण परवानाधारकांना त्यांच्या सन २०१३-१४ साठीच्या लक्ष्यांक पूर्ततेची माहिती आयोगास सादर करण्यास सांगितले होते.

| अनु. क्र. | वितरण परवानाधारक | प्रकरण क्र. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड | सन २०१४ चे प्रकरण क्र. १९० |
| २ | बेस्ट उपक्रम | सन २०१४ चे प्रकरण क्र. १९१ |
| ३ | टाटा पॉवर कंपनी लिमिटेड | सन २०१४ चे प्रकरण क्र. १९२ |
| ४ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड | सन २०१४ चे प्रकरण क्र. १९३ |

२) त्यानुसार उपरोक्त वितरण परवानाधारकांनी संबंधित माहिती आयोगास सादर केली आहे. सदर माहिती आयोगाच्या www.merc.gov.in / www.mercindia.org.in या संकेत-स्थळांवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

३) उपरोक्त वितरण परवानाधारकांनी सादर केलेल्या माहितीवर, आयोग जनतेकडून सूचना आणि हरकती मागवित असून त्या इच्छुकांनी आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यपार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई–४०० ००५, [फॅक्सः ०२२-२२१६३९७६ ई-मेल: mercindia@merc.gov.in] या पत्त्यावर दि. २० मार्च, २०१५ रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

४) इच्छुक व्यक्तींनी त्यांच्या सूचना आणि/किंवा हरकती इंग्रजी किंवा मराठीत ६ प्रतींमध्ये (१ +५) पाठवाव्यात आणि त्यामध्ये पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि असल्यास ई-मेलचा उल्लेख करावा. सूचना व हरकती कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने पाठविण्यात येत असतील तर तसे नमूद करण्यात यावे. सूचना व हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिस आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असेल तर तसे देखील त्यामध्ये नमूद करण्यात यावे. अशा व्यक्तिंना, आयोगाकडून सोमवार, दि. २३ मार्च, २०१५ रोजी सकाळी ११.३० वाजता, आयोगाच्या १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई, ४०० ००५ या पत्त्यावरील कार्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणींच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

सही/-

संचालक (वीज दर)
मविनिआ

मुंबई :
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१५